**स्थायी निदेश क्र.२२-२०२५**

**नगरपरिषदांनी विहित पध्दतीचा अवलंब न करता केलेल्या अनयिमित नेमणूकां संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत. व संबंधितांकडून करावयाच्या वसुली बाबत**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रस/प्र.क्र.२५/स्थायी नि.२२/२०२५/न.प.कर्म.अनयि.नेम.कार्य वसु./कक्ष-१२/1955**
**दिनांक :-** 28 FEB 2025

**वाचा** :- १) नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र .नपाप्र १०९९/९८/प्र.क्र.१५९/९८/नवि -१६ दिनांक ६.०५.२०००

२) या कार्यालयाचा आदेश क्र. नपसंई १०२०/प्र.क्र.१३६/२००१ दि. २०.०४.२००१.

३) या कार्यालयाचे पत्र क्र. नपप्रस १००३/प्र.क्र.३६८/०३/५ दि. ०३.०१.२००४.

४) स्थायी निदेश क्र. २१ क्र. नपप्रस १००३/प्र.क्र. ३६५/०३/५ दि. १५.०१.२००४.

५) स्थायी निदेश क्र. २९ क्र. नपप्रस २००३/प्र.क्र.२५०/०४/५ दि. १९.१०.२००४.

६) नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एम सीओ -२०१८ /प्र.क्र. १२२ /नवि -१४ दि.०५.०२.२०१९

**प्रस्तावना:-**

शासनाने दि. १०.३.१९९३ पुर्वीच्या व दि. ११.३.१९९३ ते दि. २७.३.२००० या कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना आदेशाच्या दिनांकापासून नियमित सेवेत सामावून घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यानुसार संचालनालयाने संदर्भ क्र. १ ते संदर्भ क्र. ५ येथील आदेशान्वये उक्त कालावधीमधील रोजंदारीवर कार्यरत असलेल्या, कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याकरीता कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे विहीत करून दिलेली आहेत. त्यानुसार रोजंदारी कर्मचा-यांचे समावेशन करण्यात आले आहे व येत आहे.

नगर परिषद / नगर पंचायती मध्ये अनियमित कर्मचारी नियुक्त करणे हे नियम बाह्य कृती असल्यामुळे त्यांच्या वेतनावर अनावश्यक खर्च होवू शकतो म्हणून अशी नियुक्ती झाल्यास खालीलप्रमाणे कायदेशीर कार्यवाही करून सदर नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याच प्रमाणे अशा नियुक्तीस जबाबदार असणाऱ्या अधिकारी /पदाधिकारी /कर्मचारी यांच्या कडून अशा नियुक्तीच्या वेतनावर झालेल्या अति प्रदानाची वसुली करण्यात यावी म्हणून खालील प्रमाणे मार्गदर्शक निर्देश देण्यात येत आहेत.

**आदेश :-**

**अ) अनियमित नियुक्त्या रद्द करणे संदर्भात करावयाची कायदेशीर/न्यायलयीन कार्यवाही-**

१. शासन किंवा संचालनालयाच्या आदेशाविरुद्ध दि. २८.०३.२००० नंतरसुध्दा नगर पालिका अनियमित / रोजंदारी/कंत्राटी / मानधन / हंगामी इत्यादी पद्धतीने कर्मचारी नेमतात असे

निदर्शनास आले आहे, असे कर्मचारी २४० दिवस पूर्ण झाल्यानंतर, विविध न्यायालयात सेवा नियमित करण्याकरीता तक्रार /याचिका दाखल करतात. अशा न्यायालयीन प्रकरणामध्ये नगरपरिषदांनी शासन निर्णय/शासन परिपत्रक, संचालनालयाचे परिपत्रक /सूचना /आदेश तसेच मा. न्यायालयाचे आदेश यांचे सखोल अवलोकन करून ठोस /स्पष्ट बाजू मांडावी, जेणेकरून न्यायालयाचे निकाल नगरपरिषदेच्या विरुध्द लागणार नाहीत. तरी सुद्धा नगरपालिके विरुद्ध मा.न्यायालयाचा निकाल लागल्यास आणि त्या कर्मचाऱ्यास कायम करावे लागल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून वेतनावरील अतिप्रदानाच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

२. अशा अनियमित नियुक्त्या या नगरपरिषदेवर अनावश्यक आर्थिक भार टाकणा-या /नियमबाहय खर्च करणा-या कृती असून त्यामुळे येणारा खर्च हा महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ३१० अन्वये अनावश्यक व अवाजवी आहे. त्यामुळे महाराष्ट नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ नुसार संचालनालयाने अनियमित नियुक्त्या संदर्भात कार्यवाहीसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. नपप्रस १००३/प्र.क्र.३६८/०३/५ दि. ०३.०१.२००४, तसेच स्थायी निदेश क्र. २१ क्र. नपप्रस १००३/प्र.क्र. ३६५/०३/५ दि. १५.०१.२००४ तसेच स्थायी निदेश क्र. २९ क्र. नपप्रस २००३/प्र.क्र.२५०/०४/५ दि. १९.१०.२००४ नुसार मार्गदर्शक सूचना यापूर्वी निर्गमित केले आहेत. सदरचे सर्व आदेश/ मार्गदर्शक सूचना अधिक्रमित करून या स्थायी निर्देशाद्वारे खालीलप्रमाणे सुधारित निर्देश/मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

३. पूर्वीच्या हंगामी /अनियमित /कंत्राटी /रोजंदारी नेमणुकांवरील कर्मचा-यांच्या सेवा औद्योगिक कलह कायदा १९४७ मधील तरतदींनुसार संपुष्टात आणाव्यात. तसेच नवीन अनियमित नियुक्त्या करण्यात येवू नये. पूर्वीच्या अनियमित कर्मचा- यांच्या सेवा संपुष्टात आणतेवेळेस औद्योगिक कलह कायदा १९४७ मधील कलम २५ (फ), २५ (ह) तसेच आवश्यक असल्यास संबंधित कायद्यातील इतर तरतुदी व प्रचलित असलेल्या सर्व कायद्यातील तरतुदींचे परिपूर्ण पालन करण्यात यावे.

४. रोजंदारी कर्मचाऱ्यांनीसेवेत कायम करण्यासाठी न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणामध्ये न्यायालयामध्ये शासनाचे धोरण/कायदे /शासन निर्णय, आदेश, संचालनालयाचे आदेश /निर्देश इत्यादी यांचे पालन करून नगर परिषदेची बाजू परिपूर्ण रीतीने मांडण्यात यावी. व न्यायालयाचा निर्णय नगरपरिषदेच्या बाजूने लागण्यासाठी मुख्याधिकारी यांनी स्वतः प्रयत्नशिल रहावे. तसेच नगरपरिषदेविरुध्द न्यायालयाने आदेश दिले असल्यास त्या विरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील करावे व अपीलामध्ये नगरपरिषदेची बाजू परिपूर्ण मांडावी अन्यथा मुख्याधिकारी स्वतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

५. नगरपरिषदांनी कामगारांच्या (रोजंदारी/मानधन/ठेका पध्दत स्थायी /अस्थायीचे पदावर) सेवा संपुष्टात आणल्यास आणि सेवा संपुष्टात आणण्याच्या प्रक्रियेत विहित नियमांचा / पध्दतीचा अवलंब झाला नसल्यास न्यायालय नगरपरिषदेची कृती नियमबाहय ठरवितात. अशा प्रकरणी

मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याऐवजी सदरील प्रकरण नव्याने चालू करुन प्रचलित अधिनियम / नियम व विहित पध्दतीचा अवलंब करुन तसेच औद्योगिक कलह कायदा १९४७ मधील तरतुदींचा वापर करुन संबंधीतांच्या सेवा कायदेशीर रीतीने संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.

६. नगरपालिकांनी अनियमित /रोजंदारी /कंत्राटी /मानधन /हंगामी पद्धतीने सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेशिवाय विहित कार्य पद्धतीचा अवलंब न करता नियुक्ती दिल्या विरुद्ध मा. न्यायालयांनी खालीलप्रमाणे आदेश /निर्णय यापूर्वी दिलेले आहेत. सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन करून संबंधिताच्या सेवा संपुष्टात आणाव्यात तसेच नवीन अनियमित नियुक्त्या करू नये अन्यथा संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल.

अ) मा. उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ नागपूर येथील याचिका क्र.६४०/१९९७ मध्ये " मलकापूर नगरपरिषदेच्या अनियमित नेमणुकीचे संदर्भातील" पदभरतीसाठी संबंधित उमेदवार विहित अर्हता प्राप्त करीत असले तरी बेकायदेशीर पध्दतीने नियुक्त्या नियमित करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क पोहचत नाही. उलट संबधितांची वसूली करण्याचे मा. न्यायालयाचा निर्णय आहेत.

ब) मा. सर्वोच्च न्यायालयाचे सायटेशन २००४ एसओएल केस क्र.५०० मध्ये तामिळनाडू राज्य सहकारी संस्थामधील कर्मचारी भरती संदर्भातील अपील क्र.१४१३/२००३, दि.२८.७.२००४ ए. उमराणी विरुध्द निबंधक, सहाकारी संस्था आणि इतर या संदर्भात दिलेले आदेश.

क) मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल Secretary State of Karnataka and Ors. Vs. Uma Devi मध्ये विहित मार्गाचा अवलंब न करत केलेल्या नेमानुकाबाबत या संदर्भात दिलेले आदेश.

ड) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथील भंडारा नगरपरिषद विरुध्द जयवंतीभाई आणि इतर प्रकरण १९९८ (३) Mh LJ ७६५ मध्ये अनियमित / बेकायदेशीर नियुक्त्या दिल्याचे दिसून आल्या आहेत. याप्रकरणी मा.न्यायलयाने खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

I. पदभरतीसाठी विहित केलेली अर्हता धारण करीत असले तरी, बेकायदेशीर पध्दतीने नियुक्त्या नियमित करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क राहणार नाही.

II. रोजंदारीवर नियुक्त केलेली व्यक्ती ही कुठलेही पद धारण करीत नसल्यामुळे अशा व्यक्तींना "समान कामासाठी समान वेतन" हा लाभ मिळण्याचा हक्क पोहचत नाही.

III. एखादया कामावरील रोजंदारी कर्मचाऱ्याचे ते काम संपल्यामुळे त्यांना इतर दुसऱ्या रिक्त जागांवर नेमणूक देण्याचे आदेश न्यायालय देऊ शकत नाही. पदे अस्तित्वात नसतांना नेमलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत पद निर्माण झाल्याशिवाय कायम करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

IV. कितीही वर्षे हंगामी म्हणून नोकरी केली म्हणून कोणीही कर्मचारी त्या पदावर नियमित होण्याचा हक्क सांगू शकत नाही. अशा कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे अथवा त्यांची सेवा किती वर्षे झाली आहे या गोष्टी गैरलागू ठरतात.

V. कायद्याने स्थापन झालेल्या आणि शासन या वर्गात मोडणाऱ्या कोणत्याही आस्थापनेत हंगामी कर्मचाऱ्यांना नियमित करणे हा कर्मचारी नियुक्तीचा अधिकृत मार्ग कधीही ठरु शकत नाही.

VI. जे ( कर्मचारी) मागील दाराने (back door entry) सेवेत दाखल झालेले आहेत ते त्याच पध्दतीने कमी करण्यात यावेत.

VII. हंगामी कर्मचा-याची नेमणूक करतांना शैक्षणिक पात्रता व अन्य पात्रतेची पुर्तता केली जात नाही. शिवाय या नेमणूका करतांना राखीय जागांचे प्रमाणही पाळले जात नाही. त्यामुळे सरकार आपले प्रशासकीय अधिकाराचा वापर करुन अशा नियमबाहय नेमणूका नियमित करु शकत नाही.

VIII. अनियमितरित्या नेमणूक करण्याचे प्रकार सर्वत्र वाढीस लागल्याने जे विहित पध्दतीने नेमणुकीसाठी मोठयाप्रमाणात प्रतिक्षेत आहेत अशा उमेदवारामध्ये नैराश्याची भावना निर्माण झालेली आहे. त्यामुळे मागील दाराने दाखल झालेल्यांना सेवेत नियमित करण्याचा हक्क राहत नाही.

IX. नगरपरिषदेने एखादया व्यक्तीस रोजंदारी कर्मचारी म्हणून घेतल्यास अशा कर्मचाऱ्यास संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्या मान्यतेशिवाय कायम करता येतील काय हा प्रश्न उपस्थित झाल्याबाबत मा. न्यायालयाने असा निर्णय दिला की सदर पदे अस्तित्वात नसतांना किंवा पद अस्तित्वात असल्याशिवाय अशा कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

X. अनियमित नेमणुकीस जबाबदार असलेल्या पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन, मुंबई लेखा परिक्षक स्थानिक निधी कायदा १९३० मधील तरतुदीनुसार भार अधिभाराखाली झालेला खर्च वसुल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

XI. नगरपरिषदांचा उल्लेख "राज्य" (State) असा करण्यात आला आहे. सार्वजनिक संस्थेमध्ये भरती करतांना नगरपरिषदेने मोठ्याप्रमाणावर जाहीर प्रसिध्दी दिली पाहीजे.

**ब) अनियमित नेमणुकीस जबाबदार कर्मचारी/ अधिकारी/ पदाधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून वसुली करणेबाबत-**

१. दिनांक १०-०३-१९९३ पूर्वीचे व दिनांक ११-०-१९९३ ते २७-०३-२००० या कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत समावेशन करण्यास शासनाने मान्यता दिली होती. सदर आदेशापुर्वी तसेच आदेशानंतर देखील सक्षम प्राधिका-याची मान्यता न घेता रोजंदारी कर्मचा-याचे समावेशन झाले असल्यास, नियमबाह्य झालेल्या समावेशनाच्या दिनांकापासून ते शासनाच्या आदेशानुसार समावेशन झाल्याच्या दिनांकापर्यंत दिलेल्या वेतनाच्या अति प्रदानवरील खर्च.

२. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनियमित नियुक्तीस जबाबदार असणा-या नगरपरिषद अधिकारी/पदाधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार व मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० अन्वये

विशेष लेखापरिक्षण करुन घेण्यासाठी स्थानिक निधी लेखा कार्यालयास कळविण्यात यावे आणि लेखा परीक्षणामध्ये वसुली /भार अधिभार प्रकरण निर्माण झाल्यास आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

३. वरील कार्यवाही नंतर नगरपरिषदेतील अनियमित नियुक्तीच्या प्रकरणी सखोल चौकशी करुन प्रत्येक प्रकरणातील दोषी अधिकारी/पदाधिकारी/कर्मचारी यांचा कार्यालयीन हुद्या, निवासी पत्ता, वसूल करावयाच्या रक्कमेचा तपशील इ. अनुषंगिक माहितीसह परिपूर्ण प्रस्ताव वसुली संदर्भातील अंतिम निर्णयासाठी विभागीय आयुक्त, यांना सादर करावे.

४. दि.२८-३-२००० नंतर नगरपरिषदांनी रोजंदारीवर / स्थायी अस्थायी पदावर अनियमित /रोजंदारी नेमणुका केल्या असतील तर या नेमणुकांना जबाबदार असलेल्यावर वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार जबाबदारी निश्चित करुन या नेमणुकांवरील कर्मचा-यांना प्रदान केलेल्या वेतन व भत्त्यावरील प्रदानाची रक्कम वसूल करण्यात यावी.

वरील सूचना या फक्त मार्गदर्शक स्वरूपाच्या असून प्रत्येक प्रकरणी वस्तुस्थिती संबंधित अधिनियम / नियमातील तरतुद संस्थेची निकड / आपत्कालीन परिस्थिती इत्यादी बाबींचा योग्य तो सारासार विचार करून निर्णय घेण्यात यावा.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

Manoj Vijay Ranade

Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2025.02.28 16:24:59 +05'30'

**(मनोज रानडे, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई**

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

१) मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा , महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सर्व विभाग.
५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
६) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
७) अध्यक्ष /प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
८) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)
कर्मचारी